# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## सर्व विद्याशाखांसाठी सहअध्ययन अभ्यासक्रमांचे

## (को-करिक्युलर कोर्सेस - सीसी) संच आणि मार्गदर्शक सूचना

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० (एनईपी २०२०) ची अंमलबजावणी राज्यातील इतर विद्यापीठे आणि उच्च शिक्षणसंस्थांप्रमाणेच सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात सुरू आहे. महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागातर्फे जारी करण्यात आलेल्या **शासननिर्णय क्रमांक एनईपी-२०२२/ (६७/२३) / तांशि-२** मध्ये सहअध्ययन अभ्यासक्रमांसंदर्भात पुढीलप्रमाणे माहिती देण्यात आली आहे.

**(f)** Field Projects/Internship/…Co-curricular Courses (CC) and Research Project
**Co-curricular Courses (CC)** such as Health and Wellness, Yoga Education, Sports and Fitness, Cultural Activities, NSS / NCC and Fine / Applied/ Visual/ Performing Arts: **8 credits**
**To be offered in I and/or II Year**

ती लक्षात घेऊन विद्यापीठाच्या एनईपी अंमलबजावणी समितीने **विविध विद्याशाखांच्या विविध विषयांच्या चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमांचा प्रारूप आराखडा** तयार केला आहे. त्यात **पहिल्या वर्षातील द्वितीय आणि दुसऱ्या वर्षातील तृतीय व चतुर्थ सत्रांमध्ये प्रत्येकी दोन श्रेयांकांच्या (एकूण सहा श्रेयांक) सहअध्ययन अभ्यासक्रमांचा (सीसी) समावेश करावा, अशी शिफारस** करण्यात आली आहे. त्यानुसार सर्व विद्याशाखांसाठी पदवी स्तरावरील दुसऱ्या, तिसऱ्या व चतुर्थ सत्रानुसार सहअध्ययन अभ्यासक्रमांचे संच व काही अभ्यासक्रम उपलब्ध करण्यात आले आहेत. हे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना उपलब्ध करणे व त्यांच्या मूल्यमापनाबाबत पुढील मार्गदर्शक सूचना विचारात घ्याव्यात.

1. संलग्न महाविद्यालयांमधील **पदवी स्तरावरील विद्यार्थ्यांना त्यांची आवडनिवड व क्षमतेनुसार हे सहअध्ययन अभ्यासक्रम उपलब्ध असतील.** सहअध्ययन अभ्यासक्रम विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासाला पूरक आणि त्यांच्या आवडीनिवडीनुसार उपजत क्षमतांना वाव देणारे अपेक्षित आहेत. हे शिक्षण केवळ व्याख्यानांच्या स्वरूपात किंवा चार भिंतींमध्ये बंदिस्त असणे अपेक्षित नाही. विविध उपक्रमांमधील सहभागातून त्यांची कल्पनाशक्ती, प्रयोगशीलता वाढीला लागावी. शारीरिक, मानसिक विकासाबरोबरच आवडीच्या विषयांमधील पूरक कौशल्ये व ज्ञान त्यांनी हसतखेळत आत्मसात करावे, अशी भूमिका त्यामागे आहे. ती लक्षात घेऊन **विद्यार्थ्यांनी स्वत: शिकावे आणि शिक्षकांची भूमिका उत्प्रेरक व मार्गदर्शकापुरती मर्यादित असावी, हे त्यात अभिप्रेत आहे.** त्या दृष्टीने असे **सहअध्ययन अभ्यासक्रम विद्यार्थी एकट्याने, जोडीने किंवा छोट्या संख्येतील गटाने करू शकतात. तशी नोंद संबंधित शिक्षक व महाविद्यालयांनी करणे अपेक्षित आहे.**
2. स्वयंअध्ययन अभ्यासक्रम **प्रत्येकी दोन श्रेयांकाचे** आहेत. ते **प्रामुख्याने उपक्रमाधारित** असल्याने त्यासाठी **संबंधित सत्रात साधारण ३० ते ६० तास देणे अपेक्षित** आहे. दररोज, आठवड्याला किंवा विशिष्ट कालावधीत अधिक वेळ असे त्याचे स्वरूप असू शकेल.

3. सर्व विद्याशाखांच्या विविध अभ्यासमंडळांनी आपापल्या विषयांच्या अनुषंगाने व मूळ उद्देश लक्षात घेऊन प्रत्येकी दोन श्रेयांकाधारित व विद्यार्थ्यांना सहज करता येतील अशा सहअध्ययन अभ्यासक्रमांची निर्मिती नियमितपणे करणे अपेक्षित आहे. पुढील काळात विविध अभ्यासमंडळांनी तयार केलेल्या अशा उपक्रमाधारित अभ्यासक्रमांचा विहीत प्रक्रियेद्वारे या संचात समावेश करण्यात येईल.
4. सहअध्ययन अभ्यासक्रमांच्या संचातील या विषयांबरोबरच **विद्यार्थी व शिक्षकांना नवे व वेगळे सहअध्ययन अभ्यासक्रम सुचले, तर महाविद्यालय किंवा परिसंस्थांनी त्यांच्या स्तरावर सहअध्ययन अभ्यासक्रम संचालन समिती** स्थापन करून, त्यात अशा विषयांची चर्चा करावी व त्यातील **उपक्रमांचे स्वरूप निश्चित करून असे मान्य झालेले प्रस्ताव विद्यापीठात अधिष्ठाता कार्यालयाकडे पाठवावेत.** संबंधित अभ्यासमंडळे व विद्याशाखा अशा चांगल्या कल्पनांचा विचार करून त्यात आवश्यक सुधारणा करून **सहअध्ययन अभ्यासक्रमाच्या संचात समावेश** करू शकतील.
5. **सहअध्ययन अभ्यासक्रमांच्या संचालनाची जबाबदारी केवळ क्रीडा व कलाशिक्षकांची असणार नाही. शारीरिक शिक्षण व आरोग्य, शारीरिक शिक्षण व योग यासारखे क्रीडाशिक्षक आणि क्रीडासंचालकांचे मार्गदर्शन आवश्यक असणारे विषय पदवीच्या दुसऱ्या सत्रात घेण्यात यावेत.** अन्य सत्रांमध्ये क्रीडा स्पर्धांचे नियोजन, खेळाडूंचे प्रशिक्षण, शिबिरे, आदी कामांमध्ये ते व्यग्र असल्याने त्यांच्यावर सहअध्ययन अभ्यासक्रमांचा अतिरिक्त भार येणार नाही, याची दक्षता घ्यावी. याचबरोबर **सर्व शिक्षकांचा सहअध्ययन अभ्यासक्रमांसाठीच्या मार्गदर्शन व संचालनात सहभाग असेल**, यासाठी महाविद्यालय स्तरावर प्रयत्न करण्यात यावेत.
6. सहअध्ययन अभ्यासक्रमांमागील उद्देश, स्वरूप व वैविध्य लक्षात घेऊन त्याचे **संपूर्ण मूल्यमापन महाविद्यालय स्तरावर अंतर्गत स्वरूपात** करण्यात यावे. क्रीडा विषयाबरोबरच **राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस), राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी), आदी उपक्रमांमध्ये सहभागी विद्यार्थ्यांचे मूल्यांकन करण्याची जबाबदारी संबंधित समन्वयक किंवा कार्यक्रम अधिकाऱ्यांवर** राहील. **लिखित अहवाल, सादरीकरण, संबंधित उपक्रम-स्पर्धांमधील सहभागाची प्रमाणपत्रे, महाविद्यालयातील अंतर्गत परीक्षकांमार्फत मुलाखती (व्हायवा) आदी स्वरूपात असे मूल्यमापन** करता येईल. त्यासंबंधी **निरीक्षणे व नोंदी महाविद्यालयाने योग्य स्वरूपात जतन कराव्यात.**
7. सहअध्ययन अभ्यासक्रमांमधील **चांगल्या उपक्रमांबाबतचे एकत्रित सादरीकरण किंवा प्रदर्शन** महाविद्यालयात सर्वांसमोर झाल्यास इतर विद्यार्थ्यांना त्यातून प्रोत्साहन व प्रेरणा मिळू शकेल. अशा निवडक उपक्रमांची माहिती विद्यापीठाकडे पाठवण्यात यावी.